




दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २८६
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, बुधवार, दि.२८ मे २०२५


# शेतकऱ्यांना दिलासा !

## नवीन पदभरती अन् कृषी विभागातील नावात बदल; मंत्रिमंडळ बैठकीत १० मोठे निर्णय



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२७, मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत विविध महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. यामध्ये शेतजमिनीच्या वाटणीपत्राच्या दस्तास लागणारी नोंदणी फी माफ करण्यासह इतर महत्त्वाच्या निर्णयांचा समावेश आहे. या बैठकीला मंत्रिमंडळातील इतर मंत्रीही उपस्थित होते.

मंत्रिमंडळ बैठकीत कोणते १० निर्णय?

**१.** रायगड जिल्ह्यातील पेण येथील सुहित जीवन ट्रस्च्या एकलव्य व्यवसाय प्रशिक्षण केंद्रास कार्यशाळेस तसेच,पदांना मान्यता. (दिव्यांग कल्याण विभाग) **२.** मा. शेट्टी आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील न्यायिक अधिकाऱ्यांसाठी टंकलेखकाची पदे निर्माण करण्यास मान्यता.(विधि व न्याय विभाग)

**३.** इचलकरंजी व जालना महानगरपालिकांना वस्तू व सेवा कर भरपाई अनुदान देण्यास मान्यता. इचलकरंजीला ६५७ कोटी , जालन्याला ३९२ कोटी पाच वर्षांत मिळणार (वित्त विभाग) **४.** शेतजमिनीच्या वाटणीपत्राच्या दस्तास लागणारी नोंदणी फी माफ. (महसूल विभाग)

**५.** पत्रकार क्लब ऑफ नागपूर, नागपूर यांना देण्यात आलेल्या जमनीबाबतच्या अटी-शर्तींमध्ये बदल करण्यास मान्यता. (महसूल विभाग)

**६.** फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लि. (FDCM Ltd.) मधील १ हजार ३५१ पदांच्या सुधारीत आकृतीबंधास मंजूरी (वने विभाग )

**७.** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या उच्च प्राथमिक शाळांमध्ये अंशकालीन निदेशकांच्या नियुक्तीच्या सुधारीत धोरणास मान्यता. (शालेय शिक्षण विभाग)

**८.** अशियाई विकास बैंक (ADB) सहाय्यित महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्प संस्थेवर पणन मंत्री पदसिध्द अध्यक्ष राहणार. (पणन विभाग)

**९.** कृषि पर्यवेक्षक व कृषि सहायक यांच्या पदनामात उप कृषि अधिकारी व सहायक कृषि अधिकारी असा बदल (कृषि विभाग )


**१०.** महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळाच्या नागपूर येथील १९५ कर्मचाऱ्यांना ६ व्या वेतन आयोगाची थकबाकी मंजूर (वस्त्रोद्योग विभाग)

## मुंबईत आजपासून दोन दिवस पाणीबाणी, पाणी जपून वापरण्याचे आवाहन

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२७, मुंबई :** सतत दोन दिवस धो धो पाऊस कोसळणाऱ्या पावसाने मुंबापुरीची तुंबापुरी झाली.दोन दिवस मुसळधार कोसळणाऱ्या पावसाने मुंबईकरांची दानादान उडवली होती. अशातच आता मुंबईत आज बुधवार २८ मे आणी उदया २९ मे या दोन दिवशी काही भागाचा पाणी पुरवठा पूर्णतः बंद तर काही ठिकाणी अंशता बंद असणार आहे.

या दोन दिवसांच्या दरम्यान मुंबईतील ई विभागातील पाणीपुरवठा सुस्थितीत करण्याकरिता पालिकेच्या वतीने काही



अत्यंत महत्वाची कामे तातडीने हाती घेण्यात येणार आसल्याचे पालीकेकडून सांगण्यात आले आहे.

या कामांच्या दरम्यान शहरातील काही भागात पाणीपुरवठा पूर्णतः बंद तर काही भागात अंशत: बंद ठेवण्यात येणार असल्याचं महापालिकेने सांगितलं आहे.

मुंबई शहरातील 'ए', 'बी' व 'ई' विभागातील काही परिसरांचा पाणीपुरवठा बुधवार २८ मे रोजी सकाळी १० ते गुरुवार २९ मे २०२५ रोजी सकाळी १० वाजेपर्यंत एकूण २४ तासांसाठी बंद राहणार आहे. तसंच काही भागात कमी दाबाने पाणीपुरवठा होणार आहे. त्यामुळे नागरिकांनी पाणी जपून वापरावं, असं आवाहन महापालिकेकडून करण्यात आले आहे.


या कामाच्या अंतर्गत नवानगर, डॉकयार्ड मार्ग येथील जुनी १२०० मिलीमीटर व्यासाची जलवाहिनी बंद करुन, नवीन १२०० मिलीमीटर व्यासाची जलवाहिनी कार्यान्वित करण्यात येणार आहे. तसेच भंडारवाडा जलाशयाचा कप्पा - १ वरील ९०० मिलीमीटर व्यासाचे जुने जलद्वार काढून नवीन ९०० मिलीमीटर व्यासाचे जलद्वार बसविण्यात येणार आहे. ही दोन्ही कामे बुधवार दिनांक २८ मे २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजेपासून गुरुवार दिनांक २९ मे २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजेपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. या कालावधीमध्ये 'ए', 'बी' व 'ई' विभागांतील काही भागात पाणीपुरवठा पूर्णतः बंद तर काही भागात अंशत: बंद ठेवण्यात येणार असल्याचं महापालिकेने सांगितलं आहे.

## अहिल्यानगर परिसरात मुसळधार पावसाने सीना नदीला पूर

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२७, अहिल्यानगर :** नगर शहर व परिसरात सलग तिसऱ्या दिवशी झालेल्या मान्सून पूर्व पावसाने सीना नदीला दोन दिवस पूर आल्याने नगर- कल्याण रोडवरील वहातूक काही काळ बंद करण्यात आली होती.

गेल्या काही दिवसांपासून अहिल्यानगर जिल्ह्यात मान्सून पूर्व पावसाने दमदार हजेरी लावली. तर शनिवार, रविवार आणि सोमवारी जिल्ह्यात संततधार पाऊस सुरु आहे. पावसाळ्यापूवच जिल्ह्यात २०१ मिलीमिटर पाऊस झाला आहे. सोमवारी जिल्ह्यात ३० मिलीमिटर पाऊस झाला. जिल्ह्यात शुक्रवार, शनिवार आणि रविवार असा सलग तीन



दिवस सर्वदूर पावसाने हजेरी लावली.

त्यात शनिवारी व रविवारी दक्षिण नगर जिल्ह्यातील अहिल्यानगर शहर व तालुका, श्रीगोंदा, पारनेर, कर्जत व राहुरी या तालुक्यात पावसाचा जोर चांगलाच वाढला होता. त्यामुळे नदीनाल्यांना पूर आला होता.

भाजीपाला, कांदा, आंबा, केळी, पपई आदी फळबागांचे मोठे नुकसान झाले. या पावसामुळे शेतकऱ्यांची दाणादाण झाली. मान्सून पूर्व पावसाने सोमवारी जिल्ह्यात सर्वदूर पाऊस झाला. मंगळवारीही दुपारपासून जिल्ह्याच्या अनेक भागात पावसाने हजेरी लावली. शहरात झालेल्या पावसामुळे रस्ते जलमय झाले होते.

**सोमवारी तालुकानिहाय झालेला पाऊस...**

सोमवारी जिल्ह्यात ३० मिलीमिटर पाऊस झाला. नगर ३६.९, पारनेर ४१.२, श्रीगोंदा ४२.९, कर्जत ४७.८, जामखेड ४७.७, शेवगाव १२.९, पाथड १३.३, नेवासा २७.१, राहुरी ३८.८, संगमनेर १९.१, अकोले १६.९, कोपरगाव ५.७, श्रीरामपूर २५.१, राहाता ४३.७ मिलीमिटर पाऊस झाला. सोमवारी नागपूर ६८, पारनेर ७२, कर्जत ७६.५, वालवड ७६.५, वांबोरी ६८ या पाच महसूल मंडलात अतिवृष्टी झाली.

## नागपुरात थरारक घटना, प्रेम म्हणावं की विकृती?

**दि.२७, नागपूर :** प्रेम ही भावना खूप सुंदर आहे. प्रेमात अनेकदा कठीण प्रसंग येतात. अशा परिस्थिला आपण कसं सामोरं जातो ते देखील महत्त्वाचं आहे. पण काही जणांना तेच जमत नाही. नागपुरात एका तरुणाने प्रेयसीने बोलणं बंद केल्याने संतापजनक प्रकार केला. खरंतर प्रेयसी ही कुटुंबाच्या दबावाने तसं वागत होती. यावेळी तरुणाने तिला समजून घेणं जास्त आवश्यक होतं. तसेच तिच्या कुटुंबियांचं मन जिंकणं आवश्यक होतं. पण या प्रकरणातील तरुणाने या विपरित पराक्रम केला. त्याने थेट प्रेयसीच्या घरासमोरील वाहनांची जाळपोळ केली.

बोलणे बंद केल्याने प्रियकराने प्रेयसीच्या घरी गोंधळ घालून वाहनांची जाळपोळ केली. ही थरारक घटना कपीलनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. याप्रकरणी पोलिसांनी प्रियकराविरुद्ध गुन्हा दाखल केला. स्नेहल सुनील अंबादे (वय २२,रा. कपिलनगर) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या प्रियकराचे नाव आहे. तो पेंटिंगचे काम करतो. स्नेहलचे गेल्या तीन वर्षांपासून अनामिका (वय २२, नाव बदललेले) हिच्यासोबत प्रेमसंबंधात आहेत. त्यांच्या प्रेमाबाबत अनामिकाचा भाऊ अभिषेक याला माहिती मिळाली. त्याने आई-वडिलांना सांगितले. त्यामुळे अनामिकाने स्नेहलसोबत बोलणे आणि भेटणे बंद केले. अनामिका घरीच राहायची. अनामिका भेटत नसल्याने स्नेहल संतापला. तो तिला भेटण्याचा प्रयत्न करू लागला. मात्र त्याला अपयश आले.

**तरुणाचं धक्कादायक कृत्य...**

स्नेहल अंबादे शनिवारी मध्यरात्री अनामिकाच्या पहिल्या माळ्यावरील खोलीजवळ गेला. यावेळी अनामिका ही खोलीत होती. त्याने दरवाजा ठोठावला. अनामिकाने दरवाजा उघडला नाही. तो गोंधळ घालून शिवीगाळ करायला लागला. याचदरम्यान त्याने घरासमोरील तीन मोपेड जाळल्या. शेजारी जमले. त्यांनी अनामिकाचा भाऊ अभिषेकला आवाज दिला. अभिषेकने दरवाजा उघडला असता वाहने जळताना दिसली. पाणी टाकून अभिषेक आणि शेजाऱ्यांनी आग विझवली. दरम्यान, स्नेहल पसार झाला. अभिषेकने कपिलनगर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## थोडक्यात

### टाकळी ढोकेश्वर मधील आठवडे बाजारकरूंचे हाल !

#### अवकाळी पावसाने शेतीच्या कामांना ब्रेक...



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२७, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यात अवकाळी पावसाने चार दिवस जोरदार हजेरी लावली. या पावसाने आज मंगळवारी टाकळी ढोकेश्वर गावचा आठवडे बाजारात बाजारकरूंची त्रेधातिरपीट उडाली. पावसाने जनजीवन विस्कळित केले. तसेच शेतीच्या कामांना ब्रेक लागला आहे.

दरम्यान मंगळवारी दिवसभर पाऊस सुरू होता. परंतु वादळी वारा व विजांचा कडकडाट नसल्याने वित्तहानी झाली नाही. तालुक्यात गेल्या आठवड्यापासून अधूनमधून अवकाळी पावसाचा जोर वाढल्याने शेतकऱ्यांना घरातच बसून रहावे लागले. सोमवारी रात्री परिसरात जोरदार पाऊस झाला. वारंवार विजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांचे हाल झाले. मंगळवारी (दि.२७) दुपारनंतर पावसाची संततधार सुरू झाली. दिवसभर सुर्यदर्शन झाले नाही. मंगळवारी टाकळी ढोकेश्वर गावाचा आठवडे बाजार होता. सकाळ पासूनच बाजाराला सुरुवात झाली होती. दुपारनंतर पावसाने १०- २० मिनिटांच्या अंतराने पावसाच्या जोरदार सरी कोसळत होत्या. त्यामुळे परिसरातील बाजारकरूंचे तसेच नागरिक,महिलांचे अतोनात हाल झाले. आठवडेभर काम केल्यानंतर या बाजारात येणाऱ्या मजुरांची संख्या जास्त असते. मात्र या पावसाने मजुरांची दिवसभर ओढाताण झाल्याचे दिसले. सखल भागात पाणी साचले होते. तर बाजारतळावर व इतर परिसरात दलदल झाली होती. मंगळवारी टाकळीकरांची पावसाने त्रेधातिरपीट उडाल्याचे दिसले. तालुक्यात सर्वत्र अवकाळी पावसाने दैना केली.

तालुक्याच्या विविध भागात सुरू असलेल्या अवकाळी पावसामुळे शेतात पाणी साचल्याने मशागतीची कामे खोळंबली आहेत. संततधार पावसामुळे उन्हाळी कांद्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. कांद्याचा रंग बदलला असून अनेक ठिकाणी कांदा सडल्यामुळे तो फेकून देण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. या पावसामुळे अनेक भागात कांदा,अंबा, टोमॅटो, कोबी फ्लॉवर, झेंडू फळबागांचे मोठे नुकसान झाले. शेतीची कामे ठप्प झाली आहेत.

**तणनाशक फवारणीकडे कल !**

यंदा अवकाळी पावसाने लवकर हजेरी लावली आहे. पावसाने काही शेतकऱ्यांची शेत नांगरणी राहिली आहे. पेरणीपूर्व मशागतींना सततच्या पावसाने वाव मिळत नाही. संततधार पावसाने शेतात तण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. पावसाने दोन- तीन दिवस विश्रांती दिली की शेतकऱ्यांचा आता तणनाशक फवारणीकडे कल असल्याने कृषी सेवा केंद्रावर शेतकऱ्यांची लगबग सुरू झाली आहे.

### खापरखेडा स्टेशन जवळील रेल्वेच्या बोगद्यात साचते तलावासारखे पाणी



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२७, नागपूर :** खापरखेडा रेल्वे स्टेशन जवळील बोगद्यात एकाच पावसाने तलाव भरल्या सारखी परिस्थती निर्माण झालेली आहे. रेल्वे विभाग द्वारे बोगद्यात साचलेले पाणी यावर उपाय योजना करण्यात याव्या. याकरिता वंचित बहुजन आघाडीचे शहराध्यक्ष खापरखेडा शुभम वाहने यांच्या नेतृत्वात व जिल्हा महासचिव अजय सहारे यांच्या प्रमुख उपस्थितीत रेल्वे अधीक्षक पी.बी. चवारे यांना निवेदन देण्यात आले. बोगद्यात पावसाळ्यात पाणी साचत असल्यामुळे चिचोली गावातील नागरिकांना खूप त्रास सहन करावा लागत आहे. गावातील प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामपंचायत कार्यालय, विद्यार्थीचा शाळा, विद्युत केंद्रातील कर्मचारी व गावातील नागरिकांना मुख्य मार्गावर जाणे येणे करण्यासाठी हा मार्ग सोयीचा आहे. परंतु पावसाळा आला की रेल्वेचा बोगद्यातून जायचे कसे हा प्रश्न उपस्थित होतो. हा बोगदा निर्माण झाला तेव्हा पासून दरवर्षी रेल्वे प्रशासनाला निवेदन दिल्या जाते. मात्र, रेल्वे प्रशासनाकडून अजून ही दखल घेण्यात आलेली नाही. रेल्वे प्रशासनातर्फे लवकरात लवकर उपाय योजना करण्यात याव्या अन्यथा वंचित बहुजन आघाडीतर्फे गावातील नागरिकांना घेऊन आंदोलनात्मक भूमिका घेण्यात येईल. याप्रसंगी निवेदन देताना वंचित बहुजन आघाडीचे कार्यालयीन सचिव वैभव येवले, सर्कल अध्यक्ष नरोत्तम मडकवार, कमलेश सहारे, मुन्ना मेश्राम, मिथुन सहारे, अर्णव सहारे उपस्थित होते.

अक्षराज






## मस्तवाल

पुण्यातील वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणाने या आठवड्यामध्ये सगळ्यांनाच हादरवून टाकले. असे प्रकरण घडण्याची ही काही पहिलीच वेळ नाही. या पूर्वीही अशी अनेक प्रकरणे घडली. अगदी मंजुश्री सारडापासून आत्तापर्यंत गेल्या ३०-४० वर्षांमध्ये महाराष्ट्राने अनेक प्रकारचे हुंडाबळी पाहिले. प्रत्येक वेळेला त्या मुलीचा जीव जातो आणि मगच आपल्याला जाग येते. या प्रकरणामध्येही तसेच काहीसे झाले आहे. या सगळ्याचा खोलवर विचार कधी होणार, हा खरा प्रश्न आहे. समाज म्हणून दिवसेंदिवस आपण आपला करंटेपणाच सिद्ध करतो आहोत. त्यातून आपण बाहेर पडणार की नाही, हा प्रश्न आहे. त्याचबरोबर आपल्या घरातील मुलींना किंवा सुनांना अशा प्रकारे त्रास देण्याचे धाडस नक्की येते कोठून, याचाही विचार व्हायला हवा.

दिवसेंदिवस महाराष्ट्रातील गुन्ह्यांचे वेगवेगळे प्रकार समोर येतात. कधी बीडमधील मस्साजोगचा सरपंच असलेल्या संतोष देशमुखला जीवे मारले जाते. कधी त्याच बीडमध्ये आणखी एका युवकाला अशाच प्रकारे मारहाण केल्याचा व्हिडिओ प्रसिद्ध होतात. मध्येच कोणी 'खोक्या' नोटांची बंडले गाडीच्या डॅशबोर्डवर फेकून 'आपण कोणालाही विकत घेऊ शकतो,' अशा वल्गना करणारा व्हिडिओ स्वतःच जाहीर करतो. कधी या राज्यातील मंत्रिपदाची शपथ घेतलेले माननीय महाराष्ट्रावरील कर्ज एकट्याने फेडण्याची भाषा करतात. दुसऱ्या बाजूला एखादा मंत्रीच एखाद्या तरुणीच्या आत्महत्येला कारणीभूत झाल्याचे पुढे येते. गेल्या काही वर्षांमध्ये सातत्याने हे प्रकार समोर येतात. यात एकच गोष्ट समान आहे, ती म्हणजे संबंधितांचा माज आणि यंत्रणांचे अपयश!

फार पूर्वी 'इन्स्पेक्टर' किंवा निरीक्षक दर्जाच्या पोलिस अधिकाऱ्याचीही गावात दहशत असायची. त्यांनी गावातून फेरफटका मारला, तरी गुंड घाबरून पळायचे. गुंडगिरी करण्यापूर्वी आपले काय हाल होतील, याचा विचार त्यांच्या मनात यायचा; पण काळाचा महिमा असा, की बघताबघता हा धाक कमी होत गेला. कारण प्रत्येक गुंडाला कोणी 'आका' भेटू लागला. 'तू काहीही कर, फक्त मला मदत कर,' या एकाच अटीवर गावातील, तालुक्यातील, जिल्ह्यातील आणि शहरातील नेते या गुंडांना पोसू लागले. कोणा नेत्याचा वरदस्त आहे, याची खात्री पटल्यानंतर हे गुंड धुमाकूळ घालू लागले. सज्जनांना पोलिसांचा आधार वाटण्याऐवजी भीती वाटू लागली. आता तर सामान्यजन गुंड आणि पोलिस या दोघांच्या कात्रीत सापडले आहेत; पण त्यामुळे कोणालाच फरक पडत नाही. किंबहुना सर्वसामान्यांनी अशाच दहशतीमध्ये रहावे, असेच काहीसे ठरून गेले आहे.

हगवणे प्रकरण हे यातील प्रातिनिधिक उदाहरण आहे. या घरातील दोन्ही सुनांना घरातील मंडळींकडून मारहाण होत असल्याचे आता पुढे आले आहे. मारहाण करणारे सासरे हे अजित पवार यांच्या पक्षाचे पदाधिकारी. त्यांची सातत्याने मोठ्या नेत्यांबरोबर उठबस. शिवाय पोलिसांमध्ये वरिष्ठ अधिकारी यांचे नातेवाईक. इतके पोषक वातावरण असल्यावर आपले कोण वाकडे करणार, ही गुर्मी न येते, तरच नवल! या घरातील मोठी सून मारहाणीबद्दल तक्रार करण्यासाठी पोलिस ठाण्यात गेली, तेव्हा तिने ही तक्रार देणे कसे चुकीचे आहे, हेच तिला पटवून देण्याचा प्रयत्न झाला. कारण ती ज्यांच्या विरोधात तक्रार देत आहे, ती नावे घेतली तर त्यांच्या 'आका'कडून लगेचच फोन येईल, याची पोलिसांना खात्री होती; पण तिचे म्हणणे ऐकून संबंधितांना वेळेतच जरब बसविली असती, तर त्याच घरातील धाकट्या सुनेचा जीव वाचला असता. याबद्दल त्या पोलिसांना आता जरा तरी शरम वाटत असेल का? अशी यंत्रणा तयार करणाऱ्यांना कधी तरी आपली मुलगी यामध्ये भरडली जाईल, याची भीती का वाटत नाही, हा खरा प्रश्न आहे.

# समाजात फोफावलेली लोभी-हव्यासी 'हगवणे' प्रवृत्ती

अनंत बोरसे
शहापूर जिल्हा ठाणे
९१५८४९५०३७

कधीकाळी पुण्याचा लौकिक सांस्कृतिक, सुसंकृत लोकांचे शहर असा होता मात्र गेल्या काही वर्षांपासून पुण्याचे रुपडेच पालटले आहे आणि सत्प्रवृत्तींपेक्षा दुष्प्रवृतींच फोफावल्या आहेत. या सांस्कृतिक शहरात हुंडाबळी सारख्या घडाव्यात हे अतिशय दुर्दैवी आहे. काही दिवसांपूर्वी पैसा, संपत्ती, समाजात मानमरातब असलेल्या हगवणे कुटुंबियांनी इतका पैसा असुन देखील पैशाच्या हव्यासापोटी सुनेचा बळी घेतला याच्या तीव्र प्रतिक्रिया राज्यात ऊमटल्या. याच एखादी परकी मुलगी आपल्या घरात लक्ष्मी म्हणून येते याचा गैरअर्थ हगवणे प्रवृतीसारखे लोभी काढतात आणि पैसा मिळण्याचे साधन म्हणून सुनेकडे पहातात याचमुळे अनेक 'हुंडाबळी' च्या घटना घडतात. हुंड्याची प्रथा पुर्वीच्या काळी होती मात्र बदलत्या काळात हे प्रकार थांबावेत यासाठीच हुंडा देणे आणि घेणे याला कायद्याने बंदी घातली, हुंडा प्रतिबंधक कायदा आहे. मात्र या ना त्या मार्गाने हुंडा वसुली केली जाते. कालानुरूप समाज बदलला, मात्र हुंड्याच्या हव्यासाची प्रवृत्ती कालही होती, आजही आहे हे 'हगवणे' च्या निमित्ताने अधोरेखित झाले. याच वेळी नाशिक आणि पुण्यात देखील अशाचघटना घडल्या आणि सातत्याने कुठे ना कुठे घडतच असतात.

महिला व मुलीवरील अत्याचाराच्या घटनांना, आळा बसावा या साठीच अनेक कायदे केले गेले, वेळोवेळी कायद्यात बदल करून अधिक कडक कायदे केले गेले, शासन-प्रशासन स्तरावर, सामाजिक संस्था, वैयक्तिक पातळीवर तसेच महिला आयोग यांच्या माध्यमातून प्रयत्न केले जात आहे मात्र तरी देखील महिला व मुलीवरील अत्याचाराच्या घटनां, तसेच हुंडाबळी च्या घटना थांबता थांबेना. एखादी घटना घडली कि समाजातून तीव्र प्रतिक्रिया उमटते, आपापल्या परीने निषेध केला जातो, कोणालाही सोडणार नाही, दोषींना शिक्षा होणारच अशी राणाभिमदेवी थाटात घोषणा होतात मात्र प्रत्यक्षात कारवाई करतांना आरोप कोण, त्यांचे



हितसंबंध कोणाशी, त्यांचा राजकीय संबध, आर्थिक परिस्थिती हे सगळ लक्षात घेऊन कारवाया ठरतात आणि अनेकदा शिक्षा होण्याऐवजी वाचविण्याचाच प्रयत्न केला जातो, हगवणे प्रकरणी देखील असेच दिसते. त्यामुळेच ना कोणाला कायद्याचा धाक ना शिक्षेची भिती राहिली आहे. मग हुंडाबळीच्या घटना, महिला व मुलीवरील अत्याचाराच्या घटनां थांबणार तरी कश्या? गेल्या तीन वर्षांत जवळपास चाळीस हजार तक्रारी दाखल झाल्या आहेत. मात्र समोर न आलेल्या अशा कितीतरी अज्ञात घटना घडल्या असतील.ऐकिकडे आज समाजात मुला-मुलांचे प्रमाण यात मोठी तफावत आहे, जन्म दरात विषमता आहे.अनेकांना लग्नाला मुली मिळत नाही असे असतानाही हगवणे सारखे नराधम हे सुनेचा बळी घेतात ही कसली मानसिकता? विशेष म्हणजे सुनेचा बळी घेण्यात ती ची सासु आणि नणंद या देखील दोषी आहेत,एक स्त्री असुनही त्या राक्षसी प्रवृत्तीने वागल्या.३५ वर्षांच्या मुलीला विना लग्नाची घरात ठेवून सुनांचा छळ केला जात होता.गरीब असो वा श्रीमंत, गर्भ श्रीमंत, अशिक्षित असो वा सुशिक्षित सगळीकडे हुंडाबळीच्या घटना घडतात. सुनेला मुलीप्रमाणे वागवणारे देखील अनेक कुटुंबे आहेत मात्र बहुतांश घरात सासु ती सासु सासरे ते सासरच एखाद्या मुलीसाठी ठरते आणि ती ला हिंसाचार, हुंडाबळीला बळी पडावे लागते. महिला सन्मान, बेटी बचाओ बेटी पढाओ', नारी शक्ती वंदन कायदा मंजूर केला गेला मात्र त्याची अंमलबजावणी चा वायदाच केला गेला आहे. शाहु, फुले, आंबेडकर यांचा वारसा सांगणाऱ्या पुरोगामी महाराष्ट्रात असे घडावे हे अतिशय दुर्दैवी आहे.

# पावसाळी पर्यटन करताना काळजी घ्या !

मार्च महिन्याच्या मध्यापासूनच सुरु झालेला तीव्र उन्हाळा कधी एकदा संपून वर्षाऋतू सुरु होतोय याची प्रतीक्षा सर्वांनाच होती. यापूर्वी कधीही न अनुभवलेला उकाडा यंदा अनेकांनी सहन केला. त्यामुळे पावसाळा लवकरात लवकर सुरु व्हावा अशी सर्वांचीच अगदी मनापासून इच्छा होती. इंद्रदेवानेही सर्वांच्याच इच्छेचा मान ठेवत प्रतिवर्षीच्या ठरलेल्या नियोजनात बदल केला आणि वर्षाऋतूला १३ दिवस आधीच महाराष्ट्रात पाठवले. शेतकरी, व्यावसायिक, फेरीवाले, मुंबईतील झोपडपट्यांत वसणारे नागरिक यांची पावसापूर्वी करावयाची सिद्धता तशीच राहिली असली तरी यंदाचा जीवघेणा उकाडा सहन केल्यानंतर मिळालेल्या पावसाच्या गारव्याने राज्यातील सामान्य माणूस मात्र सुखावला आहे. वर्षाऋतूच्या आगमनाचा आनंद द्विगुणित करण्यासाठी तरुणवर्ग दरवर्षी पावसाच्या आरंभी पावसाळी सहलीचे आयोजन करत असतो. राज्यातील अशी काही



पर्यटनस्थळे आहेत ज्या ठिकाणी पावसाळ्यात आनंद लुटण्यासाठी मोठ्या संख्येने पर्यटक येतात. धबधबे, नद्या, तळी किंवा समुद्रकिनारे लाभलेली ही स्थळे पावसाळ्यात ओसंडून वाहू लागतात. ही ठिकाणे जशी पर्यटकांना मनमुराद आनंद देतात तशीच याठिकाणी योग्य ती काळजी न घेतल्यास ती पर्यटकांचा जीव घेण्यासही कारणीभूत ठरू ठरतात. अशा पावसाळी पर्यटनस्थळांच्या ठिकाणी दरवर्षी कुठेनाकुठे अपघात होऊन पर्यटक पाण्यात बुडाल्याच्या किंवा वाहून गेल्याच्या बातम्या वाचनात येतात. पाण्याच्या ठिकाणी उत्साहाच्या भरात पर्यटक स्वतःला झोकून देतात. बऱ्याचदा पाण्याच्या खोलीचा आणि वेगाचा अंदाज न आल्यामुळे अपघात घडतात. तर काही अतिउत्साही तरुण तरुणी सेल्फीच्या नादात अपघातांना बळी पडतात. मद्यपान करून पाण्यात उतरल्याने पट्टीचे पोहणारे सुद्धा पाण्याच्या वेगासमोर असमर्थ ठरतात. पाण्याच्या ठिकाणी जिथे पर्यटकांची येजा असते अशा ठिकाणी जीवन रक्षकांची सुद्धा व्यवस्था असते; मात्र पावसाळ्यात येणाऱ्या पर्यटकांची संख्या पुष्कळ असल्यामुळे हे जीवन रक्षक त्या तुलनेत खूपच कमी पडतात. मौजमजेसाठी पाण्यात डुंबायला अवश्य जावे; मात्र ही मौज आपल्या जीवावर उलटणार नाही याची काळजी पर्यटकांनीच घेणे आवश्यक आहे. पाण्याच्या वेगाशी आणि खोलीशी उगाचच स्पर्धा करू नये, आपल्यासोबतच्या नातेवाईकांना आणि मित्रमैत्रिणींनाही याविषयी सक्त ताकीद द्यावी. लहान मुलांची विशेष काळजी घ्यावी. मद्यपान करून पाण्यात मुळीच जाऊ नये. आपण सहलीसाठी जातो तेव्हा घरी आपली कुणीतरी वाट पाहत असते. आपण केलेली मौजमजा त्यांना ऐकून अनुभवायची असते. अशा आपल्या जिव्हाळ्याच्या व्यक्तीला धक्का बसणारी बातमी मिळणार नाही याची काळजी घेणे आपले कर्तव्यच नव्हे का ?

- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई
संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०

## वीर सावरकर..

थोर वीर सावरकर
समाज क्रांतिकारक
अग्निकुंड प्रज्वलित
धगधगते ते लेखक

मातृभूची ओढ सदा
भारत माता सेवक
सळसळतेक्रांतीवीर
कहाणी हृदयद्रावक

कनवाळू कवि मना
वृत्ती जरी आक्रमक
मॉर्सेलिसच्या उडीने
कळे मातृप्रेम चमक

कर्मठ असे विचारे
हिंदुधर्माचे संघटक
विचारत ती स्पष्टता
हिंदू सर्व समावेशक

कर्मकांडा न बंदिस्त
विज्ञाननिष्ठ प्रचारक
हिंदु धर्मा नवीन रुप
विचार पिढीस प्रेरक

वळण दिले भाषेला
भाषा शुद्धी प्रवर्तक
भाषा न् लिपीशुध्दी
मराठी प्रेम प्रसारक

क्षितीजापारची दृष्टी
यंत्र युगाचे समर्थक
इतिहास देतो साक्ष
राष्ट्र भक्तीचे ज्ञोतक

- हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६.

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# शहरांच्या नियोजनाचा पुनर्विचार व्हावा!

मुंबईत मान्सूनने जोरदार सलामी दिली आहे. मागील दोन तीन दिवसांपासून मुंबईत चालू असलेल्या पावसाने मुंबईकरांची त्रेधातिरपीट उडवली. रविवारी तर मुंबईत २९४ मिली पाऊस झाला. तब्बल १०७ वर्षांनंतर मुंबईत मे महिन्यात विक्रमी पाऊस झाला. मुंबईत पावसाने जोरदार हजेरी लावल्याने मुंबई पुन्हा एकदा तुंबली. पाणी तुंबल्यामुळे मुंबईकरांचे अतोनात हाल झाले. जागोजागी गुडघाभर पाणी साचले. रस्त्यांवर देखील पाणी साचले. रस्त्यांवर पाणी आल्याने रस्ते वाहतूक खोळंबली. महामार्गावर पाणी आल्याने शेकडो गाड्या जागेवरच थांबल्या त्यामुळे वाहतूक कोंडी झाली. रिक्षा, टॅक्सी यांनी जणू अघोषित संप पुकारला. रेल्वे मार्गावर पाणी साचून रूळ पाण्याखाली रेल्वेचे वेळापत्रक कोलमडले. पावसामुळे काही लांब पल्ल्याच्या गाड्या उशिराने धावू लागल्या. लोकलही धीम्या गतीने सोडाव्या लागल्या. लोकांच्या घरात पाणी साचल्याने लोकांचा संसार पाण्याखाली गेला. एकूणच पावसाने मुंबईची चांगलीच दैना उडवली. या पावसाने २६ जुलै २००५ रोजी झालेल्या प्रलयकारी पावसाची आठवण झाली. पावसामुळे मुंबईची दैना झाल्यावर नेहमीप्रमाणे दोषारोपांची मालिका सुरू झाली. सत्ताधारी व विरोधक एकमेकांवर आरोपांच्या फैऱ्या झाडू लागले. मोठ्या पावसाने मुंबईची दैना का झाली याला जबाबदार कोण ? यावर राजकारण सुरू झाले ; पण मोठ्या पावसानंतर मुंबईची दैना का होते ? पाऊस वाढला की मुंबईची तुंबई का होते ? या प्रश्नाकडे मात्र सर्वच पक्ष सोईस्कर डोळेझाक करीत आहेत. २६ जुलैच्या पावसानंतर शासन, प्रशासन आणि नागरिकांनीही कोणताच धडा घेतला नाही म्हणूनच ही वेळ पुन्हा आली. पूर्वी मुंबईत मोकळ्या जागा असायच्या त्यामुळे तिथे पाण्याचा निचरा व्हायचा. पण आता मुंबईत मोकळ्या जागाच राहिल्या नाहीत. विकासाच्या नावाखाली मुंबई सिमेंटचे जंगल बनले आहे. मुंबईतील रस्तेही सिमेंटचे आणि पेव्हर ब्लॉकचे बनले आहे त्यामुळे पाणी मुरायला मुंबईत जागाच नसते. त्यात मोठा पाऊस आणि भरती एकाच वेळी आली तर ते सर्व पाणी नागरी वस्तीतच शिरते. मुंबई तुंबण्याचे आणखी एक कारण म्हणजे प्लास्टिक ! राज्य सरकारने प्लास्टिकवर बंदी घातली असली तरी मुंबईत दररोज हजारो टण प्लास्टिक कचरा जमा होतो. या प्लास्टिक कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यात प्रशासन अपयशी ठरत आहे. हे प्लास्टिक नदी, नाल्यामध्ये अडकल्याने तेथून पावसाचे पाणी वाहत जाण्यास अडचण निर्माण होते. राज्य सरकारने प्लास्टिकवर घातलेली बंदी किती योग्य आहे हे या पावसामुळे तरी नागरिकांना समजेल. नागरिकांनीही प्लास्टिकचा वापर टाळायला हवा. यासोबतच नागरिकांनी वाटेल तिथे कचरा टाकायची सवयही मोडायला हवी. ग्लोबल वॉर्मिंगमुळे दरवर्षी मुंबईच्या समुद्र पातळीत वाढ होतेय. मुंबई तुंबण्याचे हे ही एक कारण आहे. पावसामुळे केवळ मुंबईचीच नाही तर सर्वच मोठ्या शहरांची अशीच अवस्था होते. मागील वर्षी दिल्लीत झालेल्या मुसळधार पावसामुळे दिल्ली जलमय झाल्याचे आपण पाहिलेच आहे. पाच वर्षापुर्वी राज्याची उपराजधानी असलेल्या नागपूर शहराचीही पावसामुळे दैना झाली होती. मुसळधार पावसामुळे नागपूर शहर पाण्याखाली गेले होते. त्यावेळी विधिमंडळाचे अधिवेशन नागपुरात सुरू होते. इतका पाऊस झाला की पावसाचे पाणी थेट विधान भवनात शिरले होते. त्यामुळे विधिमंडळाचे अधिवेशन तहकूब करावे लागले. पावसामुळे विधिमंडळाचे अधिवेशन तहकूब करण्याची नामुष्की सरकारवर आली होती. पावसामुळे विधिमंडळाचे अधिवेशन तहकूब करण्याची इतिहासातील ती पहिलीच वेळ होती. मागील काही वर्षात पावसामुळे पुणे, मुंबई, नागपूर, नाशिक, औरंगाबाद, कोल्हापूर, सांगली ही शहरे जलमय झाल्याचे आपण पाहिले आहे. राज्यातील सर्वच शहरात कमी अधिक प्रमाणात हीच परिस्थिती आहे. पाऊसही बेभरवशाचा झाला आहे. पूर्वीसारखा पावसाचा देखील अंदाज येत नाही. दोन दोन महिने न येणारा पाऊस दोन तासात येऊन दोन महिन्यांची सरासरी गाठतो. आता हेच पहा ना यावर्षी मे महिन्यातच पावसाने धुमाकूळ घातला आहे. मे महिन्यातील पावसाने आजवरचे सर्व रेकॉर्ड तोडून टाकले आहेत. मे महिन्यात असा इतका पाऊस यापूर्वी कधीही झाला नव्हता. या सर्व परिस्थितीचा विचार करता मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, औरंगाबाद, कोल्हापूर, सांगली यासारख्या मोठ्या शहरांच्या नियोजनाचा पुनर्विचार होणे गरजेचे आहे. जलव्यवस्थापनाची आजची पद्धत बदलून नवीन पद्धतीचा अवलंब करायला हवा. त्यासाठी उच्च तंत्रज्ञानाचा वापर करायला हवा. त्यासाठी परदेशातील तज्ज्ञांची मदत घ्यायला हवी. परदेशातील जलव्यवस्थापनाचा अभ्यास करण्यासाठी तज्ज्ञांना परदेशात पाठवायला हवे. परदेशातील अधिकाऱ्यांची त्यासाठी मदत घ्यायला हवी.

- श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# उत्तरशिवच्या नदीत सोडला अति विषारी केमिकल साठा

## मुसळधार पावसाचा केमिकल माफियांनी उचलला फायदा

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२७, उत्तरशिव (डोंबिवली) :** कल्याण ग्रामीण भागातील १४ गावांमधून वाहणाऱ्या उत्तरशिवच्या नदीत केमिकलचा साठा सोडल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. दिनांक २६ मे २०२५ रोजी पहाटेपासून कोसळणाऱ्या पावसाचा फायदा घेत भंगार माफियांनी केमिकल नदी पात्रात पहाटेच्या वेळी सोडल्याचे समोर आले आहे. नदीत रासायनिक पाणी झाल्याने सध्या पाण्यावर सफेद फेसाचे तवंग आले आहेत. या १४ गावातील प्रदूषणाकडे लोकप्रतिनिधींसह प्रदूषणनाने देखील दुर्लक्ष केलं आहे.उत्तरशिवच्या नदीत रसायनयुक्त पाण्याने शिरकाव केल्याने नदीचे अस्तित्व धोक्यात आले आहे. मात्र नदीच्या प्रदूषणात होणारी वाढ लक्षात घेता प्रशासन देखील बघ्याची भूमिका घेत असल्याचे दिसून येत आहे. कल्याण ग्रामीण भागातील ठाकूरपाडा डोंगरावरून उगम पावणाऱ्या नदीत



रासायनिक पाणी सोडण्यात आले आहे. सतत याबाबत ग्रामस्थांनी तक्रारी करून देखील प्रदूषण नियंत्रण महामंडळ याकडे दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येत आहे. या नदीच्या किनाऱ्यावर मोठ्या प्रमाणात शेतकरी हे फळभाज्यांची लागवड करत असतात. भेंडी, कारले, दुधी, वांगे आदी पिकांची खरीप हंगामात भात पिकांसह लागवड करतात. मात्र या प्रदूषणाच्या विळख्यात सापडलेल्या उतरशिवच्या नदीला प्रदूषणाच्या जाचातून शासन कधी मुक्त करणार? असा प्रश्न सध्या उपस्थित झाला आहे. उत्तरशिवची नदी दररोज नवे रंग घेत आहे. कधी हिरवा रंग तर कधी लाल रंग या नदीच्या पाण्याला येत असतो. मात्र शासन याकडे दुर्लक्ष करत असल्याने भंगार माफियांचे देखील चांगलेच फावले असल्याचे दिसून येत आहे.

**जलचरांचे अस्तित्व संपुष्टात -**

उतरशिवाच्या नदीचा उगम हा ठाकूरपाडा डोंगरावरून झाल्यानंतर ती दहिसर – मोकाशी पाडा मार्गे उत्तरशिव नागाव नंतर देसाई खाडीला जाऊन नदी मिळते. नदीत सोडल्या जाणाऱ्या रासायनिक सांडपाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्यासह जलचरांचे अस्तित्व संपुष्टात आले आहे. प्रक्षणाच्या विळख्यात सापडलेल्या या नदीची प्रदूषणामधून कोण मुक्तता करणार असा प्रश्न निर्माण झाला आहे.

**नदी फेसाळली -**

१४ गावांमधील प्रदूषणाने डोके वर काढले आहे. पहिल्याच पावसात नदी फेसाळली आहे. याचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत असून येथील समस्या राज्यकर्ते कधी समजून घेणार, असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.

# थोडक्यात

## मुसळधार पावसाने सीना नदीला पूर; नगर - कल्याण रोडवरील वाहतूक बंद

**अक्षराज : वसंत रांधवण**



**दि.२७, अहिल्यानगर :** नगर शहर व परिसरात सलग तिसऱ्या दिवशी झालेल्या मान्सून पूर्व पावसाने सीना नदीला दोन दिवस पूर आल्याने नगर– कल्याण रोडवरील वहातूक काही काळ बंद करण्यात आली होती. गेल्या काही दिवसांपासून अहिल्यानगर जिल्ह्यात मान्सून पूर्व पावसाने दमदार हजेरी लावली. तर शनिवार, रविवार आणि सोमवारी जिल्ह्यात संततधार पाऊस सुरु आहे. पावसाळ्यापूवच जिल्ह्यात २०१ मिलीमिटर पाऊस झाला आहे. सोमवारी जिल्ह्यात ३० मिलीमिटर पाऊस झाला. जिल्ह्यात शुक्रवार, शनिवार आणि रविवार असा सलग तीन दिवस सर्वदूर पावसाने हजेरी लावली. त्यात शनिवारी व रविवारी दक्षिण नगर जिल्ह्यातील अहिल्यानगर शहर व तालुका, श्रीगोंदा, पारनेर, कर्जत व राहुरी या तालुक्यात पावसाचा जोर चांगलाच वाढला होता. त्यामुळे नदीनाल्यांना पूर आला होता. भाजीपाला, कांदा, आंबा, केळी, पपई आदी फळबागांचे मोठे नुकसान झाले. या पावसामुळे शेतकऱ्यांची दाणादाण झाली. मान्सून पूर्व पावसाने सोमवारी जिल्ह्यात सर्वदूर पाऊस झाला. मंगळवार, दिनांक २७ मे २०२५ रोजी ही दुपारपासून जिल्ह्याच्या अनेक भागात पावसाने हजेरी लावली. शहरात झालेल्या पावसामुळे रस्ते जलमय झाले होते.

# राजकीय महत्वकांक्षा नसल्याने भूलथापा देत नाही - मोहनराव रोकडे

## वाढदिवसानिमित्त गाजदीपूर येथे साखर व खाऊ वाटप

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.२८, सुपा (अहिल्यानगर) :** समाजकारणाला मी प्रथम प्राधान्य देतो कोणत्याही प्रकारचे माझी राजकीय महत्त्वाकांक्षा नाही. त्यामुळे सर्वसामान्य जनतेला राजकारणासाठी मी भूलथापा देत नाही आणि देणार ही नाही. गाजदीपूर मधील समस्या व प्रश्न सोडवण्यासाठी सर्व सहकार्यांसमवेत चर्चा करून या पुढील काळात नक्कीच प्राधान्याने काम करणार असल्याचे मत मोहनराव रोकडे यांनी व्यक्त केले.

पारनेर तालुक्यातील वडगाव सावताळ येथील सामाजिक कार्यकर्ते व लोकनेते मोहनराव रोकडे यांच्या वाढदिवसानिमित्त आदिवासी भागातील गाजदीपूर येथे सामाजिक उपक्रम राबवण्यात आला. या प्रसंगी गाजदीपूर येथील सर्वसामान्य कुटुंबांना साखर वाटप करण्यात आली. तसेच लहान मुलांना खाऊ वाटप करून त्यांच्या चेहऱ्यावर आनंद पसरवला गेला. गावकऱ्यांनी एकत्र येत मोहनराव रोकडे यांचा सत्कार व सन्मान करत त्यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.हा कार्यक्रम गाजदीपूर येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी शिक्षक नेते संतोष खामकर, माजी ग्रामपंचायत सदस्य अंकुश ढेकळे, युवा नेते खंडू कोळेकर, ग्रामपंचायत सदस्य दादाभाऊ नऱ्हे, उत्तम नऱ्हे, आप्पासाहेब सातकर, विजय सातकर, संतोष करगळ, नानाभाऊ सातकर, छबू बर्डे, सुभाष करगळ, देवका बर्डे, विक्रम पवार, सहादू पवार, सुखदेव वाघ, अर्जुन पवार, बाळू गांगुर्डे, धनेश करगळ, विष्णू करगळ, संतोष सातकर यांच्यासह अनेक ग्रामस्थ, महिला व भगिनी उपस्थित होत्या.



गावकऱ्यांनी मोहनराव रोकडे यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक करत त्यांच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना केली.मोहनराव रोकडे यांनी आपल्या वाढदिवसाच्या निमित्ताने राबवलेल्या या उपक्रमातून त्यांची गावाप्रती असलेली सामाजिक बांधिलकी पुन्हा एकदा अधोरेखित झाली. गाजदीपूरसारख्या आदिवासी भागात अशा उपक्रमांमुळे समाजात एकता आणि आपुलकी वाढते, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले. मोहनराव रोकडे यांनी नेहमीच सामाजिक कार्यात अग्रेसर राहून गावकऱ्यांच्या सुख–दु:खात सहभाग घेतला आहे. त्यांच्या या कार्यामुळे ते परिसरात आदराचे स्थान प्राप्त झाले आहे.या उपक्रमादरम्यान गावकऱ्यांनी मोहनराव रोकडे यांच्या कार्याला पाठिंबा दर्शवला आणि त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. अशा उपक्रमांमुळे गावातील सामाजिक ऐक्य अधिक दृढ होत असल्याचे उपस्थितांनी नमूद केले.

## वाघाच्या हल्ल्यात दोन वेगवेगळ्या ठिकाणी २ ठार

**अक्षराज : वसंत वडस्कर**




**दि.२७, (मूल) चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्ह्यात मानव–वन्यजीव संघर्ष टोकाला पोहचला असून २७ मे २०२५ रोजी वाघाने मूल तालुक्यात दोघांना ठार केल्याची घटना उघडकीस आली आहे. मागील १७ दिवसात वाघाने ११ नागरिकांची शिकार केली असून ५ महिन्यात २३ नागरिकांचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाला. पहिल्या घटनेत मूल तालुक्यातील कांतापेठ गावातील ५२ वर्षीय सुरेश मुंगरु सोपानकार हा मंगळवार, दिनांक २७ मे २०२५ रोजी चिरोली मार्गावरील जंगलात बकऱ्या चारण्यासाठी गेला होता. दुपारच्या सुमारास बकऱ्याचा कळप गावात परतला मात्र, सुरेश हा न परतल्याने गावातील नागरिकांनी याबाबत वनविभागाला माहिती दिली. गावकरी व वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी चिरोली मार्गावरील जंगलात शोध मोहिम राबवली असता सुरेश चा छिन्न–विछिन्न अवस्थेतील मृतदेह आढळला. सुरेशचा पूर्ण पाय वाघाने खाऊन टाकला होता. दुसऱ्या घटनेत मुल तालुक्यातील भगवानपूर मधील जंगल परिसरात बांबूच्या बारीक काड्या, सरपण आणि कुड्याची फुले आणण्याकरीता चिरोली गावातील ४५ वर्षीय संजीवनी मॅकलवार ही महिला पती संजय मॅकलवार, नातेवाईक कवडीमोल बोमनवार, शांताबाई कवडू बोमनवार हे चौघे वनविकास महामंडळाच्या कंपार्टमेंट क्रमांक ५२४ मध्ये सकाळी ९ वाजताच्या सुमारास गेले होते. अचानक झुडपात दबा धरुन बसलेल्या वाघाने संजीवनी ला पती व नातेवाईकासमोर वाघाने फरफटत नेले, पती व त्यांच्या नातेवाईकानी आरडाओरडा करीत वाघाला हुसकावून लावले. मात्र, तोपर्यंत संजीवनीचा मृत्यू झाला होता. या घटनेनंतर गावातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. यावेळी वनविकास महामंडळाचे वनपरिक्षेत्र अधिकारी एस.बी.बोथे, वनपाल शिंदे, कर्मचारी गव्हारे, अशोक सिंघण, टोलेवाही येथील पोलीस पाटील संगिता चल्लावार, चिरोलीचे पोलीस पाटील गोकुळ मोहूर्ले, चिरोली येथील वनरक्षक सविता गेडाम, प्राणीमित्र उमेश झिरे, आणि मूल येथील प्रभारी पोलिस निरीक्षक सुबोध वंजारी घटनास्थळी दाखल झाले.

**हल्ल्याचे सत्र** - मे महिन्यात तेंदूपत्ता हंगाम सुरु झाल्यापासून वाघाने आपला आत्क सुरु केला आहे. १० मे पासून वाघाने सतत हल्ले करीत आत्तापर्यंत ११ नागरिकांना ठार केले आहे. वाघाचे हल्ले नियंत्रणात यावे यासाठी वनविभागाने ठोस पावले उचलली नसल्याने नागरिकांचे बळी जात आहे. मागील ५ महिन्यात २३ नागरिक वाघाच्या हल्ल्यात बळी पडले आहेत.

# ४ थी कॅडेट, जुनिअर राष्ट्रीय तायक्वानडो स्पर्धेसाठी मुंबईचे १८ खेळाडू करणार महाराष्ट्र राज्याचे नेतृत्व

**अक्षराज : सुनिल साखरकर**

**दि.२७, मुंबई :** इंडिया तायक्वानडो संघटनेच्या वतीने महाराष्ट्र ओलम्पिक संघटनेचे महासचिव तथा इंडिया तायक्वानडो अध्यक्ष नामदेव शिरगांवकर यांच्या सहकार्याने ४थी कॅडेट आणि जुनिअर राष्ट्रीय तायक्वानडो स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे सदर स्पर्धेत मुंबई संघाचे १८ खेळाडू करणार महाराष्ट्र राज्याचे नेतृत्व, मुंबई संघटनेचे अध्यक्ष तथा दादोजी कोंडदेव पुरस्कार विजेते भास्कर करकेरा यांनी सांगितले. ४ थी कॅडेट आणि जुनिअर राष्ट्रीय तायक्वानडो स्पर्धा २९ मे ते ०१ जून २०२५ या कालावधीत उत्तराखंडमधील मल्टीपर्पज हॉल, परेड ग्राउंड, देहरादुन येथे कॅडेट आणि जुनिअर गटाच्या स्पर्धा , क्युरोगी व पुमसे क्रीडा प्रकारात रंगणार असून देशभरातील खेळाडू आपले कौशल्य पणाला लावणार आहेत. जवळपास १ हजार ६०० मुले व मुली,



पदाधिकारी, मार्गदर्शक, संघव्यवस्थापक, अधिकारी, सहाय्यक सहभागी होत आहेत. नुकत्याच झालेल्या नाशिक येथील राज्य स्पर्धेतील सुवर्ण पदक विजेते खेळाडू ह्या स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करणार आहेत. तायक्वानडो खेळातील क्युरोगी आणि पुमसे क्रीडा प्रकारात तायक्वानडो असोसिएशन ऑफ मुंबई संघातील खेळाडूंनी बरीच पदके पटकावली त्यांच्या या यशाबद्दल मुंबई जिल्हा संघटनेचे अध्यक्ष तथा दादोजी कोंडदेव पुरस्कार विजेते भास्कर करकेरा, सचिव विल्सन वरळीकर, आंतरराष्ट्रीय खेळाडू – राजेश खिल्लारे, आंतरराष्ट्रीय पंच उषा शिर्के धामणसकर, शिव छत्रपती पुरस्कार विजेते किशोर सिंग, जिल्हा पुरस्कार विजेते सिद्धेश घाग, राहूल वाघमारे, सहाय्यक – विरेंद्र गायकवाड, सुनिल साखरकर आणि पालक वर्ग तसेच ताय क्वानडो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र (कल्याण) संघटनेचे अध्यक्ष संदिप ओंबासे, महासचिव गफार पठाण यांच्या वतीने अभिनंदनात्मक शुभेच्छाचा वर्षाव करण्यात येत आहे.

**राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघाच्यावतीने निवड झालेले मुंबई जिल्ह्याचे खेळाडू –**

क्युरोगी – विघ्नेश गोट्टीमुकुल्ला, वीर वायाळ, अक्षरा शानभाग

वैयक्तिक पुमसे – काव्या धोदाप्यानोर

कॅडेट पेर पुमसे – कियान देसाई, विधी बुधे

जुनिअर पेर पुमसे – रुद्र खंदारे, शिवानी तेली

फ्री स्टाईल वैयक्तिक पुमसे – ध्रुव तंबाके

फ्री स्टाईल पेर पुमसे – ध्रुव तंबाके, उर्वी चव्हाण

फ्री स्टाईल टीम पुमसे (मुले) – शार्दूल शेंद्रे, गौरव नागवेकर, अथर्व सावंत

फ्री स्टाईल टीम पुमसे (मुली) – उर्वी चव्हाण, मंजिरी तळगांवकर, रिया बनिया.

या संपूर्ण संघास संघ प्रशिक्षक सिद्धेश घाग, प्रेमकुमार श्रेष्ठ. संघ व्यवस्थापक स्वाती गोट्टीमुकुल्ला यांचे सहकार्य लाभले.

## मुंबईतील ओव्हल मैदानावरील क्रिकेटचा धुरळा थांबला; मैदानावर पसरली हिरवी शाल



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२७,चर्चगेट (मुंबई) :** जागतिक वारसा लाभलेल्या मुंबईतील चर्चगेट येथील ओव्हल मैदान गेले काही दिवस पडत असलेल्या अवकाळी पावसामुळे निरव शांततेत असल्याचे पाहायला मिळत आहे, चर्चगेटच्या अगदी दक्षिणेला जवळ जवळ २२ एकर क्षेत्रफळ असलेला ओव्हल मैदान हे एक लोकप्रिय मनोरंजन मैदान असून ज्यामध्ये क्रिकेट आणि फुटबॉल हे लोकप्रिय खेळ खेळले जातात. सर्वसामान्य गरीब, कष्टकरी खेळाडूंकरिता फुटबॉल सह, क्रिकेट, अन्य खेळांसाठी ओव्हल मैदान अनेकांना सोयीचे ठरत असून हिवाळा, उन्हाळ्याच्या दिवसात हा मैदान खेळाडूंनी तुडुंब भरलेला पाहायला मिळतो, अनेक कंपन्या तसेच छोटे मोठे क्रिकेट संघ या ठिकाणी क्रिकेट सामने भरवत असल्याने मैदानाचा अक्षरशः धुरळा उडालेला असतो,मात्र अवकाळी पावसामुळे ह्या मैदानाला थोडा का होईना विसावा मिळाला आहे. अवघ्या १० दिवसांच्या पावसाने संपुर्ण मैदान हिरवे गार गवताने बहरले असून निसर्गाने जणू हिरवी शालच मैदानावर पांगरली असल्याचे मोहक दृश्य पाहायला मिळते.

# प्रसिध्दीच्या प्रवाहात न वाहणारा नितळ मनाचा झरा म्हणजेच.. सहाय्यक पोलीस निरिक्षक भास्करराव शिंदे

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२७, विंचूर (नाशिक) :** लासलगाव पोलिस ठाण्यात सध्या कार्यरत असलेले सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे यांच्या बाबत सध्या लासलगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीत सामान्य माणूस चर्चा करताना दिसत आहेत, खाकी वर्दी म्हटली की पोलीसां सोबत मैत्री नको अनं दुश्मनी पणं नको अशी सर्वसामान्यांची धारणा आहे, मात्र खाकी वर्दीच्या आतिल या अवलिया अधिका–र्यांने लासलगाव पोलिस ठाण्यात हजर



झाल्यापासून अनेक महत्त्वपूर्ण प्रकरणात कठोरपणे अंमलबजावणी करण्यापासून ते ग्रामीण भागातील सामान्य माणसाला न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केल्याचं दिसून येते.

दिनांक २६ मे २०२५ रोजी लासलगाव बाजार तळातील महादेव मंदिरापाशी अचानक वारा आणि पावसाच्या सरी येऊ लागल्याने अडोशास काही डोके उभे असल्याचे बघून तिथं आसरा घेतला. त्यावेळी लासलगाव पोलीस स्टेशन व अधिकाऱ्यांबद्दल तेथे चर्चा रंगल्याचे दिसून आले. त्यातच एक मनाला भावेल असा किस्सा प्रत्येकदर्शी असलेल्या ओळखीच्या व्यक्तीने सांगितले.